# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ५९ गुरूवार दि.०४ सप्टेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## 'स्वतंत्र गॅझेटमधून मराठा समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न' ; मराठा समाज समन्वयकांचा आरोप; पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी भूमिका जाहीर करावी



कऱ्हाड: मनोज जरांगे-पाटील यांनी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सुरू केलेल्या उपोषणानंतर सरकारने हैदराबाद आणि साताऱ्याचे स्वतंत्र गॅझेट काढण्याचे आश्वासन दिले. मात्र, दोन स्वतंत्र गॅझेट काढणे म्हणजे मराठा समाजात फूट पाडण्यासारखेच आहे, असा आरोप करून मराठा समाजाच्या समन्वयकांनी पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी याबाबत आपली भूमिका स्पष्ट करावी, असे आवाहन आज पत्रकार परिषदेत केले आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे- पाटील हे अंतरवाली सराटीतून लाखो मराठा बांधवांसमवेत मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण सुरू केले होते. त्यांच्या उपोषणाच्या आजच्या शेवटच्या दिवशी सरकारच्या वतीने मंत्र्यांच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन त्यांना हैदराबाद गॅझेट लागू करण्यात येईल, सातारा गॅझेट महिनाभरात लागू करण्यात येईल, मराठा व कुणबी एक असल्याचा निर्णय तांत्रिक बाबी तपासून जलदगतीने घेतला जाणार, आंदोलकांवरील केसेस मागे घेण्यात येतील.

आंदोलनात बलिदान दिलेल्या आंदोलकांना शासकीय नोकरी देण्यात येईल, मुंबईत आंदोलकांच्या वाहनांना आरटीओकडून करण्यात आलेला दंड माफ करण्यात येईल, अशी आश्वासने देण्यात आली आहेत. मात्र, सातारा आणि हैदराबाद गॅझेट हे स्वतंत्र लागू न करता एकत्र लागू करणे आवश्यक होते. दोन स्वतंत्र गॅझेट काढणे म्हणजे मराठा समाजात फूट पाडण्यासारखेच आहे.

मुंबईतील जरांगे- पाटील यांच्या उपोषणादरम्यान विदर्भ, मराठवाड्यातील सर्वच पक्षातील आमदार, खासदार यांनी भेटून त्यांच्याशी चर्चा केली. मात्र, पश्चिम महाराष्ट्रातील अपवाद वगळता आजी-माजी खासदार, आजी-माजी आमदार तिकडे फिरकलेच नाही. त्यामुळे नाराजी व्यक्त केली जात आहे. आम्ही मतदान करून खासदार, आमदारांना निवडून दिले आहेत. त्यामुळे आमच्या आरक्षणाच्या विषयाला त्यांनी उचलून धरलेच पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रातील आजी-माजी खासदार, आजी-माजी आमदार, मंत्री यांच्यासह नेत्यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत आपली भूमिका स्पष्ट करावी, अन्यथा त्यांना पुढील काळात त्याचे परिणाम भोगावे लागतील, असाही इशारा देण्यात आला.

## मराठा आरक्षणासंदर्भातील जीआरवरुन महायुतीत नाराजी; भुजबळांची कॅबिनेट बैठकीला दांडी

मनोज जरांगे यांचे आझाद मैदानावर सुरू असलेल्या आमरण उपोषणाच्या पाचव्या दिवशी राज्य सरकारकडून मोठा निर्णय घेण्यात आला. मराठा आरक्षणावर हैदराबाद गॅझेटियर लागू करण्यासंदर्भात राज्य सरकारने शासन आदेश काढला.

यावेळी मनोज जरांगे यांनी केलेल्या ८ पैकी सहा मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. त्यानंतर काल २ सप्टेंबर रोजी आझाद मैदानावर विजयी गर्जना करत मनोज जरांगे यांनी आमरण उपोषण सोडलं. मात्र राज्य सरकारच्या या निर्णयानंतर महायुतीमध्ये वाद निर्माण झाला आहे. छगन भुजबळांचा मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि ओबीसी समाजाचे नेते छगन भुजबळ यांचा यांचा राज्य सरकारकडून मराठा आरक्षणासंदर्भात काढण्यात आलेल्या जीआरला विरोध असल्याची माहिती समोर येत आहे. भुजबळ यांनी बुधवारी होत असलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार टाकला आहे. भुजबळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्री-कॅबिनेट बैठकीला हजेरी लावली होती. ही बैठक झाल्यानंतर भुजबळ राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीला न जाता सह्याद्री अतिथीगृहातून बाहेर पडले. काय म्हणाले छगन भुजबळ? छगन भुजबळ यांनी बुधवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना मराठा आरक्षणासंदर्भात काढण्यात आलेल्या जीआरबाबत भाष्य केले. त्यांनी म्हटले की, काल सरकारने जो जीआर काढला आहे, त्याबद्दल आमचे ओबीसी नेते आणि कार्यकर्ते यांच्या मनात शंका आहेत. त्यामुळे आम्ही कोण हरलं का कोण जिंकलं का, याचा विचार करत आहोत. आम्ही याबाबत कायदेशीर सल्ला घेत आहोत.




पुढे ते म्हणाले, या जीआरचा नेमका अर्थ काय आहे? कारण कुठल्याही जातीला उचलून दुसऱ्या जातीत टाकण्याचा हक्क कुठल्याही सरकारला नाही. जात बदलता येत नाही. आम्ही मराठा आरक्षणाच्या जीआरविरोधात न्यायालयात जाणार आहोत. काही लोक म्हणतात, हरकती मागवल्या पाहिजे होत्या. उपसमितीला निर्णय घ्यायचा अधिकार आहे का, हा देखील प्रश्न विचारला जात आहे. राज्य सरकार असा निर्णय घेईल, याची अपेक्षा आम्हाला नव्हती, असे छगन भुजबळ यांनी म्हटले.

दरम्यान, या प्रकरणानंतर आता मराठा-कुणबी ही न्यायालयीन लढाई कमी न होता वाढणार असल्याचे दिसत आहे. न्यायालयात मराठा आरक्षणासंबंधीच्या याचिका असताना, यातच आता नव्याने शासन परिपत्रकाआधारे ही नवीन न्यायालयीन लढाई सुरू होणार हे स्पष्ट होत आहे.

# तेलंगणात मोठी राजकीय घडामोड ! केसीआर यांनी मुलीची पक्षातून केली हकालपट्टी ; पक्षविरोधी कारवायांचा आरोप

भारत राष्ट्र समितीने (बीआरएस) एक धक्कादायक निर्णय घेतल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. पक्षविरोधी कारवायांच्या आरोपाखाली विधान परिषद सदस्य (एमएलसी) आणि केसीआर यांची मुलगी के. कविता यांना बीआरएसमधून निलंबित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. कविता यांचे वडील आणि बीआरएस प्रमुख के.चंद्रशेखर राव यांनी कविता यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाचे सरचिटणीस टी. रविंदर राव आणि आणखी एक सरचिटणीस (शिस्तविषयक बाबींचे प्रभारी) सोमा भरत कुमार यांनी एका संदेशात माध्यमांना ही माहिती दिली आहे . समोर आलेल्या माहितीनुसार,कविता यांचे वडील आणि बीआरएस प्रमुख के. चंद्रशेखर राव यांनी त्यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे. असे म्हटले आहे. पक्षविरोधी कारवायांमुळे बीआरएसचे नुकसान कविताच्या अलीकडील वर्तनामुळे आणि त्यांच्या पक्षविरोधी कारवायांमुळे बीआरएसचे नुकसान होत असल्याचा दावा केला जात आहे. पक्ष नेतृत्वाने ते गांभीर्याने घेतले आहे. एमएलसी कविता यांचे निलंबन अशा वेळी झाले आहे जेव्हा एक दिवस आधी तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी राज्यातील मागील बीआरएस राजवटीत बांधलेल्या कालेश्वरम प्रकल्पातील कथित अनियमिततेची सीबीआय चौकशी करण्याची घोषणा केली होती. या चौकशीबाबत, भारत राष्ट्र समितीच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस सरकारच्या सीबीआय चौकशीच्या निर्णयाविरुद्ध निदर्शने केली. बीआरएस नेत्यांनी आरोप केला की, या प्रकरणाची सीबीआय चौकशीचा आदेश देणे हा पक्षप्रमुख केसीआर यांच्यावर नियोजित हल्ला आहे.

## संभाजी महाविद्यालयाचे जेष्ठ सेवक बी. बी. देशमुख सेवानिवृत्त



मुरुड/ महेंद्र आल्टे :- संभाजी महाविद्यालय मुरुड येथील ज्येष्ठ सेवक श्री. बी. बी. देशमुख नियत वयोमानानुसार ३४ वर्ष प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झालेले आहेत. सेवानिवृत्ती समारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. बी.एस. (दादा) पटाडे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून समाज जागृती शिक्षण संस्थेचे सचिव ॲड. विजयजी पाटील उपस्थित होते. तसेच संस्थेचे उपाध्यक्ष श्री. डी.बी.देवकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम यांचीही यावेळी उपस्थिती होती. ॲड.विजयजी पाटील बोलताना म्हणाले की, श्री. देशमुख यांना कामाची आवड होती तसेच त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे महाविद्यालयामध्ये सेवा बजावलेली आहे. महाविद्यालयाच्या उभारणीत त्यांचे मोलाचे योगदान आहे. अध्यक्षस्थानावरून बोलताना श्री. बी.एस. (दादा) पटाडे म्हणाले की, श्री.देशमुख यांनी काम चांगले केले आहे. त्यांना अनेक वर्षाचा कामाचा अनुभव होता. त्यांचे एक विशेष म्हणजे ते कमी बोलायचे आणि काम जास्त करायचे त्यांनी कोणतेही काम टाळले नाही महाविद्यालयाचा पाया मजबूत करण्याचे काम त्यांनी केलेले आहे. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अशोक काळम यांनी श्री. देशमुख यांनी केलेल्या कामाचे कौतुक करून सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा विभागप्रमुख प्रा.मधुकर क्षीरसागर यांनी केले तर आभार डॉ. बी.एम. गोरे यांनी मानले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने श्री. देशमुख यांचे नातेवाईक, महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## सुरज कुमठेकर सेट परीक्षा उत्तीर्ण

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अतंर्गत जुन २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षेत लाईफ सायन्स (वनस्पतीशास्त्र)या विषयात सेट परीक्षेत सुरज त्र्यंबक कुमठेकर यांनी उत्तीर्ण होऊन यश संपादन केले आहे.



या यशाबद्दल माजी मंत्री बाळासाहेब जाधव,मा. टि.एन.कांबळे, वैज्ञानिक एफ एवं कार्यालय अध्यक्ष बेनियामिन, वैज्ञानिक डॉ.प्रशांत कवर, वैज्ञानिक डॉ.मयुर कांबळे ,प्रा. डॉ.रागिनी बोदडे,माजी परिवहन अधिकारी प्रभाकर भालेराव, परिवहन निरीक्षक हिरामण कुमठेकर,कुमठा (बु) चे सरपंच आण्णासाहेब कुमठेकर, संकेत लांडगे, डॉ.सचिन डोंगरे,शुभम मोरे,सोमेश शिंदे,बल्लु डोंगरे, धनंजय जाधव,गगंथडे यांनी सुरज कुमठेकर यांचे अभिनंदन केले आहे. सध्या तो भारतीय वनस्पती सर्वेक्षण विभाग येथे संशोधक विद्यार्थी म्हणून कार्यरत आहे.

## बुद्धिबळ राज्य स्पर्धेत आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त; समृद्धी कातळे हिचे आ. कराड यांच्याकडून कौतुक



लातूर : - केवळ बुद्धिबळाच्या वेबसाइटवर सराव करीत लातूर जिल्ह्यातील रेणापूरच्या समृद्धी देवीदास कातळे हिने नुकत्याच छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या ज्युनिअर गटातील राज्य स्पर्धेत आंतरराष्ट्रीय मानांकन मिळविले असून फिडेच्या रेटिंगमध्ये स्थान मिळविणारी पहिली लातूरची महिला खेळाडू ठरली आहे तिच्या या यशाबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून कौतुक केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

रेणापूरच्या श्रीराम विद्यालयात इयत्ता नववीत शिकणाऱ्या समृद्धी कातळे हिने बुद्धिबळ खेळात नेत्रदीपक यश मिळविले आहे. या स्पर्धेत राज्यातील ज्युनिअर गटातील १५० महिला खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. यात अनेक मातब्बर खेळाडूंचाही समावेश होता. आपल्या चाणाक्ष कौशल्याचा आधार घेत समृद्धीने प्रथमच बुद्धिबळ खेळात लातूरच्या शिरपेचात हा तुरा खोवला आहे या यशाबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी समृद्धीचा यथोचित सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी समृद्धीचे वडील रेणापूर सोसायटीचे चेअरमन, अँड. देविदास कातळे, पत्रकार रामेश्वर बद्दर, पर्यवेक्षक अनिल कुटवाड, चंद्रकांत कातळे, दशरथ सरवदे यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती.

## खा. आशोकराव चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत

### १४ सप्टेंबर रोजी लातूर येथे भाजपा कार्यकर्त्यांचा संकल्प मेळावा, जिल्हाध्यक्षांचा सत्कार सोहळा

लातूर : - भारतीय जनता पार्टी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने भाजपाचे नुतन ग्रामीण जिल्हाध्यक्ष श्री. बस्वराज पाटील यांचा जाहीर सत्कार आणि मतदार संघातील कार्यकर्त्यांचा संकल्प मेळावा राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. आशोकराव चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत येत्या १४ सप्टेंबर २०२५ रविवार रोजी आयोजीत करण्यात अला असल्याची माहीती भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी दिली.





भारतीय जनता पार्टीचे लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी माजी मंत्री बस्वराज पाटील यांची नुक्तीच प्रदेश भाजपा पक्ष श्रेष्ठीच्या वतीने निवड करण्यात आली असून त्यांचा लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने राज्याचे माजी मुख्यमंत्री भाजपाचे नेते खा. आशोकराव चव्हाण यांच्या शुभहस्ते जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. या सत्कार सोहळ्याच्या निमित्ताने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यांचा भव्य संकल्प मेळावा आयोजीत करण्यात आला आहे.

संकल्प मेळावा आणि सत्कार सोहळा या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड हे भुषविणार आहेत. तर यावेळी राज्य कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष श्री. पाशा पटेल, जिल्हायाचे माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, औसा विधानसभेचे आ. अभिमन्यू पवार, गोपीनाथ मुंडे ऊस तोड कामगार मंडळाचे अध्यक्ष श्री. गोविंद अण्णा केंद्रे, माजी आमदार श्री. शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, माजी जिल्हाध्यक्ष श्री. दिलीपराव देशमूख यांच्यासह इतर अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सदरील संकल्प मेळावा आणि सत्कार सोहळा येत्या १४ सप्टेंबर २०२५ रविवार रोजी दुपारी २ वाजता लातूर येथील विश्व पॅलेस मंगल कार्यालयात होणार असून या मेळाव्यास लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते बंधू भगिनींनी बहूसंख्येनी उपस्थित राहावे असे आवाहन मतदार संघातील भाजपाचे मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, सुरज शिंदे, शरद दरेकर आणि उध्दव काळे यांनी केले आहे.

# संपादकीय

## निवडणूक आयोगाची भूमिका

काँग्रेस नेते राहुल गांधी व राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांची गेले दोन आठवडे बिहारमध्ये सुरू असलेली मतदार अधिकार यात्रा आता संपली. या काळात २५ जिल्ह्यांमधून ही यात्रा फिरली आणि दोन दशकांनंतर काँग्रेसचा झेंडा बिहारमध्ये सर्वत्र फडकला. एरव्ही तृणमूल काँग्रेस हा पक्ष काँग्रेसपासून फटकून राहत असतो; पण त्यांनीही आपले खासदार यात्रेसाठी धाडले होते.

पाटणा येथे झालेल्या या यात्रेच्या सांगता समारंभात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, इंडिया आघाडीतील झारखंड मुक्ती मोर्चाचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन, खासदार संजय राऊत तसेच विकासशील इन्सान पार्टीचे प्रमुख मुकेश सहानी आणि सीपीआय (एमएल) लिबरेशनचे प्रमुख दीपंकर भट्टाचार्य प्रभृती उपस्थित होते. तसेच या यात्रेत वेगवेगळ्या वेळी तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलीन, समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी, काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी यांनीही सहभाग नोंदवला.

बिहारमध्ये लवकरच विधानसभा निवडणुका होणार असून, त्यामुळे जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी ही यात्रा काढली. लोकशाहीत कोणत्याही पक्षाला वा आघाडीला या प्रकारे प्रचार करण्याचा अधिकार असतो आणि तो काँग्रेस व राजदने बजावला, तर त्यात काही चूक नाही. संपूर्ण यात्रेत 'व्होट चोर, गद्दी छोड' ही घोषणा दिली जात होती. महाराष्ट्र व हरियाणा या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मतचोरी करून भाजपने निवडणुका जिंकल्या असून, या राज्यांमध्ये मतचोरी कशी केली गेली, हे काँग्रेसकडून लवकरच उघड केले जाईल, असे राहुल गांधी आरा येथील जाहीर सभेत म्हणाले.

यापूर्वी दिल्लीमध्ये पत्रकार परिषदेत कर्नाटकातील लोकसभा निवडणुकांमध्ये मतांची चोरी केली गेल्याचा दावा राहुल यांनी केला होता. त्यांनी पहिल्यांदा महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत मतचोरी झाल्याचा आरोप केला होता; मात्र त्या संदर्भात कोणतेही पुरावे सादर केले नव्हते. राहुल यांच्या यात्रेची सांगता पाटणा येथील ऐतिहासिक गांधी मैदानात जाहीर सभेने केली जाणार होती; पण राज्य सरकारने परवानगी दिली नाही.

वास्तविक, ही परवानगी नाकारण्याचे काहीच कारण नव्हते. या यात्रेस चांगला प्रतिसाद मिळाला आणि याचे एक कारण म्हणजे, बिहारमध्ये केंद्रीय निवडणूक आयोगाने राबवलेल्या मतदार फेरतपासणी मोहिमेबद्दल (एसआयआर) तीव्र नाराजी निर्माण झाली होती. त्यासंबंधात अनेक प्रश्न विचारले जात होते आणि त्यास आयोग समाधानकारक उत्तरे देऊ शकला नव्हता. या पार्श्वभूमीवर बिहारमध्ये प्रसिद्ध केलेल्या मसुदा मतदार याद्यांसंबंधी १ सप्टेंबरनंतरही हरकती, दुरुस्त्या व दावे दाखल करता येतील, असे आयोगाने सोमवारी सर्वोच्च न्यायालयात स्पष्ट केले.

एसआयआरच्या पहिल्या टप्प्यानंतर या मसुदा मतदार याद्या प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यासंबंधी दावे, हरकती नोंदवण्यासाठी आयोगाने दि. १ सप्टेंबर २०२५ ची मुदत दिली होती. त्याविरोधात दाखल केलेल्या याचिकांवर न्या. सूर्यकांत आणि न्या. जोयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर सोमवारी सुनावणी झाली. आता मूळ मुदतीनंतरही हरकती, दुरुस्त्या दाखल करता येतील, अशी नवी भूमिका जाहीर करून आयोगाने हटवादीपणा थांबवलेला दिसतो.

आता मतदार याद्या अंतिम झाल्यानंतर हे दावे विचारात घेतले जाणार आहेत. म्हणजेच नामांकनाच्या अखेरच्या तारखेपर्यंतही प्रक्रिया सुरू राहील आणि अंतिम मतदार याद्यांमध्ये नावांचा समावेश केला जाईल किंवा ती वगळली जातील, असे न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले. अंतिम मतदार याद्या दि. ३० सप्टेंबरला प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. बिहारमध्ये एसआयआर नियोजित वेळापत्रकाप्रमाणे सुरू असल्याचे सांगताना आयोगाने रविवारी एक धक्कादायक दावा केला होता. ९८.२ टक्के मतदारांकडून योग्य ती कागदपत्रे मिळाली आहेत. गणनाक्रमाच्या फॉर्मच्या संकलनाप्रमाणेच हे आणखी मोठे यश आहे किंवा निदान तसा विश्वास ठेवावा, असे आयोगाला वाटत असावे. मतदार याद्यांची मोहीम पूर्ण झाली.

बिहारमधील जवळपास प्रत्येकाकडे निवडणूक आयोगाला हवी असलेली कागदपत्रे आहेत आणि मसुदा मतदार याद्यांमध्ये प्रत्येक व्यक्तीच्या नावाचा अंतिम मतदार यादीत समावेश झाला आहे, असा आभास आयोगाच्या या आकडेवारीवरून झाला होता; पण आयोगाच्या आकडेवारीवर कोणाचाही विश्वास नाही. शिवाय तसे नसते, तर आयोगाने मूळ भूमिकेत बदल का केला आहे आणि मुदत का वाढवून दिली आहे? आयोगाला अपेक्षित असलेली कागदपत्रे देणार्या लोकांचे प्रमाण आणि ज्यांनी आयोगाला आधारसारखी कागदपत्रे दिली आहेत; पण ती मान्य करायला आयोग तयार नाही, अशा लोकांचे प्रमाण याच घटकावरून अंतिम मतदार यादीतून किती नावे वगळली जाणार आहेत किंवा किती लोकांचा मतदानाचा अधिकार हिरावला जाणार आहे, हे कळले आहे.

बिहारमधील एसआयआर मोहिमेंतर्गत निवडणूक नोंदणी अधिकार्यांना ३ लाख मतदारांच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्या आहेत. त्यामुळे या मतदारांना कागदपत्रांच्या तपासणीसाठी ७ दिवसांत अधिकार्यांसमोर हजर राहण्याची नोटीस बजावल्याचे वृत्त तीन दिवसांपूर्वीच प्रसिद्ध झाले होते. दि. १ ऑगस्ट रोजी जाहीर झालेल्या मसुदा मतदार यादीत ७.२४ कोटी मतदारांची नावे समाविष्ट केली आहेत. ज्या मतदारांनी कोणतीही कागदपत्रे सादर केली नाहीत तसेच ज्यांच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आली आहे, अशा मतदारांना निवडणूक नोंदणी अधिकार्यांनी नोटिसा पाठवण्यास सुरुवात केली आहे; मात्र यामध्ये कोणतेही नियम वा कायद्याचा उल्लेख नसल्याची तक्रार आहे. बिहारमधील सर्व ७.८९ कोटी नोंदणीकृत मतदारांना मसुद्यात नाव समाविष्ट करण्यासाठी मुदतीत गणना अर्ज भरणे आवश्यक होते; मात्र निश्चित तारखेपर्यंत केवळ ७.२४ कोटी अर्ज प्राप्त झाल्याने उर्वरित ६५ लाख मतदारांची नावे यादीतून वगळली; पण या ६५ लाख मतदारांची यादी जाहीर करण्याचे आदेश आयोगाला देण्याची वेळ सर्वोच्च न्यायालयावर आली होती. कारण, सत्ताधार्यांच्या दडपणामुळे काही नावे वगळल्याचा आरोप झाला होता. निवडणूक आयोगावर विनापुरावा बेछूट आरोप करणे चुकीचे आहेच; पण कारभारामुळे आयोगानेही प्रतिष्ठा जपायला हवी.

# आमिष लग्नाचे आमंत्रण अत्याचाराचे

आपल्या राज्यात महिलांना फसवून त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून नंतर लग्नाचे आमिष दाखवून विविध ठिकाणी त्यांच्यावर बलात्कार केलेल्या बातम्या वाचनात आलेल्या आहेत. त्या तुम्ही सुद्धा वाचल्या आहेत त्या अशा की,✻ लग्नाच्या आमिषाने बलात्कार करणाऱ्याला पिंपरीत अटक. पिंपरी : लग्नाचे आमिष दाखवून एकाने मैत्रिणीसोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर तुझी जात वेगळी आहे म्हणत लग्नाला नकार दिला. याप्रकरणी गुरुवार दिनांक २८ऑगस्ट २०२५ रोजी हिंजवडी पोलीस ठाण्यात बलात्कारासह अट्रोसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

याप्रकरणी २४ वर्षीय तरुणीने हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली आहे. त्यानुसार आरोपी सुनील शालिकराम पराळे (वय वर्ष २६, राहणार मारुंजी हिंजवडी ) याला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ही घटना मार्च २०२५ ते ८ ऑगस्ट २०२५ या दरम्यान घडली. पीडित तरुणी आणि आरोपी मित्र आहेत.आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करून तिला लग्नाचे आमिष दाखवले. हिंजवडी येथील फ्लॅटवर घेऊन जात तिच्या सोबत शारीरिक संबंध ठेवले. त्यानंतर आरोपीने तुझी जात वेगळी आहे असे म्हणत तिच्याशी लग्न करण्यास नकार दिला. तसेच अपमानास्पद वागणूक दिली .

हिंजवडी पोलीस तपास करत आहेत. अशाच प्रकारची दुसऱ्या घटनेची बातमी ✻ लग्नाच्या आमिषाने महिलेवर अत्याचार दोन लाख उकळले. पुणे : सोशल मीडियावरील विवाह विषयक संकेतस्थळावरून झालेल्या ओळखीतून महिलेवर अत्याचार करण्यात आल्याचा प्रकार नुकत्याच उघडकीस आला आहे .यासंदर्भात रविवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी खराडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या महिलेची आक्षेपार्ह छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन आरोपीने दोन लाख रुपये उकळल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

अमित गंगाधर शेंडगे (राहणार पारगाव जिल्हा सोलापूर ) हे संशयित आरोपीचे नाव आहे. पीडित महिला आणि आरोपी शेंडगे यांची गेल्या वर्षी (सप्टेंबर २०२४ ) महिन्यात विवाहविषयक संकेतस्थळावरून ओळख झाली होती. शेंडगे याने या महिलेला विवाहाचे आमिष दाखवून तिला जाळ्यात ओढले. त्यानंतर तो महिलेला भेटण्यासाठी पुण्यात आला. शेंडगेने या महिलेला एका हॉटेलमध्ये नेऊन तिच्यावर बलात्कार केला. तसेच तिची छायाचित्रे त्याने मोबाईलवर काढली. त्यानंतर शेंडगेने महिलेला धमकावण्यास सुरुवात केली.

हॉटेलमध्ये काढलेली छायाचित्रे सोशल मीडियावर प्रसारित करण्याची धमकी देऊन तिच्याकडून दोन लाख रुपये उकळले. महिलेने विवाहाबाबत विचारणा केल्यावर त्याने विषारी औषध पिऊन आत्महत्या करण्याची धमकी तिला दिली. त्याच्या धमकीमुळे घाबरलेल्या महिलेने नुकतीच खराडी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. त्यानुसार बलात्कार, तसेच माहिती- तंत्रज्ञान कायद्यान्वये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तिसरी घटना थोडी वेगळी असली तरी अल्पवयीन मेहुणीवर स्वतः च्या बहिणीच्या पतीने म्हणजेच दाजीनेच बलात्कार केला आहे.

जवळचे नातलग सुद्धा कसे अत्याचार करतात त्या बाबत राग येणारी बातमी वाचावयास मिळाली ती अशी की, ✻ दाजीने केला मेहुणीवर अत्याचार.... राजगुरुनगर : अल्पवयीन १६ वर्षाच्या मुलीला ' तू माझ्यासोबत चल नाहीतर मी माझ्या जीवाचे बरे वाईट करेल ' अशी धमकी देऊन दाजीनेच मेहुणीवर बलात्कार केल्याची घटना घडली. अजय दादाभाऊ गावडे ( राहणार वडाचीवाडी केंदूर तालुका शिरूर ) असे आरोपीचे नाव असून खेड पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत खेड पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार पीडित अल्पवयीन मुलगी खेड तालुक्यातील आहे. आरोपी हा पिडीत मुलीच्या बहिणीच्या पती आहे.

२८ ऑगस्ट २०२५ रोजी आरोपी रात्री खेडमध्ये येऊन पीडित मुलीच्या घरी जाऊन मला कांद्याची गाडी खाली करायला पुण्याला जायचे आहे. तू माझ्यासोबत चल , तू माझ्याबरोबर नाही आली तर मी माझे जीवाचे काहीपण करेल , ' तू घराच्या बाहेर ये ' असा पीडित मुलीच्या आईच्या मोबाईलवर मध्यरात्री फोन केला होता. त्यानंतर आरोपीने मुलीला गाडीत बसून पुणे येथे जाऊन पुन्हा गाडीतून शिक्रापूर जाधव वस्ती( तालुका शिरूर ) रात्रीच आणले. भाड्याने खोली घेऊन दोन दिवस वेळोवेळी पीडितेवर बलात्कार केला.

पीडित मुलीने आरोपीला सांगितले की ,मला माझ्या आई-वडिलाकडे घरी सोडा, परंतु आरोपीने ' तू माझे बरोबर राहायचे, तू माझे बरोबर राहिली नाही तर मी तुझ्या बहिणीला मारून टाकील ' अशी मला धमकी दिली. त्यानंतर ३१ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास पीडित मुलीची आई ,वडील , चुलते हे शिक्रापूर जाधववस्ती तालुका शिरूर येथे मुलीला शोधत आले असता ,आरोपी अजय दादाभाऊ गावडे हे खोलीवरून पीडित मुलीला सोडून पळून गेला. पीडित मुलीने घडलेला प्रकार आई-वडील व नातेवाईकांना सांगितला व खेड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पुढील तपास सुरू आहे.

वरील तीन घटनांच्या बातम्या वाचल्या नंतर आपल्या देशातील महिलांच्या सुरक्षेतेच्यासाठी वेगवेगळे कठोर कायदे केलेले असले तरी, महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्यामध्ये अजिबात खंड पडत नाही. आपल्या रोजच्या विविध वर्तमानपत्रात एक तरी बातमी महिलांवर केलेल्या अत्याचाराची असते. म्हणजेच महिलांचे संरक्षण करण्यास आपले सरकार कमी पडतं असल्याचा भास होत आहे. समाजातील सुज्ञ लोकांनी सुद्धा असे गुन्हे करणारांना पकडून देण्यासाठी सरकारला मदत करणेची गरज निर्माण झाली आहे. कारण अशा बऱ्याच हतबल पीडित महिलाना मदतीची गरज असते.

काही नराधम लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार करतात आणि नंतर पुन्हा तू वेगळ्या जातीची असल्यामुळे तुझ्याशी लग्न करता येणार नाही. पण तिच्यावर बलात्कार करताना तिची जात आडवी येत नाही. अशा प्रकारची कारण सांगणाऱ्या नराधमावर सरकारने कठोरात कठोर कारवाई करणेची गरज आहे. नाही तर आमिष लग्नाचे आमंत्रण अत्याचाराचे असाच भास होतो.

✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻

लेखक
जी. एस. कुचेकर पाटील
भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा
मो.न. ७५८८५६०७६१

# गडांचा राजा : राजगड

सह्याद्रीच्या उंच डोंगररांगांच्या कुशीत उभा असलेला, भव्यता आणि ऐतिहासिक वैभव यांचा अद्वितीय संगम म्हणजे राजगड! छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या उभारणीतील पहिला भक्कम पाया या गडाने घातला. तब्बल पंचवीस वर्षे स्वराज्याची राजधानी म्हणून राजगडाने अनेक ऐतिहासिक घटना, शौर्यगाथा, राजकीय निर्णय आणि युद्धांचा साक्षीदार होण्याचा मान मिळवला. मराठ्यांच्या पराक्रमाला व स्वराज्याच्या कर्तृत्वाला दिशा देणारा हा गड, केवळ एक किल्ला नसून स्वराज्याच्या आत्म्याचे मूर्तिमंत प्रतीक आहे. राजगड किल्ल्यावर पोहोचण्याचा प्रवास रोमांचकारी आहे. दाट जंगलातून जाणाऱ्या पायवाटा, खडतर चढण आणि सह्याद्रीच्या निसर्गसौंदर्याचा आनंद यामुळे हा प्रवास अविस्मरणीय ठरतो. गडावर पोहोचल्यानंतर दिसणारे विस्तीर्ण पर्वत आणि खोल दऱ्यांचे विहंगम दृश्य थकवा दूर करून मन भारावून टाकते. इतिहास, साहस आणि निसर्ग यांचा अद्भुत संगम राजगडावर अनुभवता येतो. हा किल्ला केवळ एक पर्यटनस्थळ नाही, तर मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाचे दार आहे. इथली शांतता, प्राचीन वास्तू आणि डोंगरमाथ्यावर वाहणारा गार वारा प्रत्येकाला पुन्हा-पुन्हा येथे येण्यासाठी प्रेरित करतो. प्राचीन इतिहास आजचा राजगड किल्ला मुळात मुरुंबदेव या नावाने ओळखला जात होता. विविध राजवटींच्या अखत्यारीत असताना या ठिकाणी फक्त बालेकिल्ल्याचा भाग अस्तित्वात होता. परंतु इ.स. १६४३ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला ताब्यात घेताच त्याचे पुनर्निर्माण सुरू झाले. तेव्हाच या गडाला राजगड म्हणजेच गडांचा राजा हे साजेसे नाव लाभले आणि स्वराज्याची राजधानी म्हणून तो घोषित करण्यात आला. या गडावर अनेक ऐतिहासिक घटना घडल्या. इथेच शिवाजी महाराजांचे सुपुत्र राजाराम यांचा जन्म झाला. त्यांची पत्नी सईबाई यांचे याच ठिकाणी दुःखद निधन झाले. १६६४ मध्ये सूरत लुटल्यानंतर मिळालेल्या संपत्तीचे संरक्षण याच गडावर करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक महत्त्वाच्या लढायांची रणनीती राजगडावर आखली. भक्कम तटबंदी, मजबूत बुरुज आणि चतुराईने बांधलेल्या रचना यामुळे हा किल्ला अभेद्य बनला. मुघल आणि आदिलशाही सैन्याने कित्येक वेळा किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला. आजही राजगड हा इतिहास, साहस आणि निसर्ग सौंदर्याचा संगम आहे. पर्यटनासाठी हा किल्ला एक उत्तम ठिकाण आहे. किल्ल्यावरील सुवेळा माची, संजीवनी माची आणि बालेकिल्ला ही विशेष आकर्षणाची ठिकाणे. राजगडावरून दिसणारे सह्याद्रीचे डोंगर आणि धुके भरलेले निसर्गदृश्य मन मोहून टाकतात. इतिहासप्रेमी, साहसिक पर्यटक आणि निसर्गप्रेमी यांच्यासाठी राजगड एक अनोखा अनुभव देणारे ठिकाण आहे. नैसर्गिक रचना आणि संरक्षण व्यवस्था राजगड किल्ला मध्ययुगीन स्थापत्यकलेचा अद्वितीय नमुना आहे. सुमारे ४० किलोमीटर परिघ असलेल्या या किल्ल्याची समुद्रसपाटीपासून उंची १३७६ मीटर आहे. भक्कम तटबंदी आणि सुयोग्य रचना यामुळे हा किल्ला संरक्षण आणि प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला. या किल्ल्याचा मध्यभाग पद्मावती माची म्हणून ओळखला जातो. येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे निवासस्थान होते. पद्मावती देवीचे मंदिर, पद्मावती तलाव आणि राजवाड्याचे अवशेष येथे पाहायला मिळतात. ही माची केवळ निवासासाठीच नव्हे, तर सैन्याच्या हालचालींसाठीही अत्यंत महत्त्वाची होती.

किल्ल्याच्या पश्चिमेला संजीवनी माची आहे. येथे तीन स्तरांमध्ये बांधलेली तटबंदी आजही मराठ्यांच्या लढाऊ कौशल्याची साक्ष देते. शत्रूच्या हल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठी ही संरचना अत्यंत उपयुक्त ठरली. पूर्व बाजूला सुवेळा माची आहे. येथून दिसणारे निसर्गसौंदर्य विलोभनीय आहे. याच ठिकाणी नेढे नावाची मोठी नैसर्गिक दगडी कमान आहे. हा भूशास्त्रीय चमत्कार किल्ल्याच्या सौंदर्यात भर घालतो. बालेकिल्ल्यावरून सह्याद्री पर्वतरांगेचे अप्रतिम दृश्य दिसते. पूर्वी येथे राजवाडा होता आणि याच ठिकाणी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जात असत.

राजगडाची भौगोलिक व लष्करी रचना अतिशय अद्वितीय आहे. किल्ला डोंगरांच्या उंचसखल उतारांवर बांधलेला असल्याने तो जिंकणे जवळजवळ अशक्य होते. एका सरळसरळ तटबंदीवर अवलंबून न राहता तीन प्रमुख माच्या – पद्मावती, संजीवनी आणि सुवेळा या गडाला त्रिसूत्री स्वरूपात जोडलेल्या आहेत. या प्रत्येक माचीचा आपापला वेगळा उपयोग होता :

पद्मावती माची – गडाचे हृदय मानली जाणारी ही माची प्रशासनिक व निवासी केंद्र होती. येथे राजसदर, पद्मावती देवीचे मंदिर, महाराजांचे निवासस्थान, राणीवसा तसेच मंत्र्यांचे निवासस्थान यांचा समावेश होता. मोठमोठ्या पाण्याच्या टाक्यांमुळे या माचीवर वर्षभर पाणी उपलब्ध असे.

संजीवनी माची – पश्चिमेकडे पसरलेली ही माची मजबूत तटबंदी, अर्धगोलाकार बुरुज आणि पहारेकऱ्यांसाठी सोयीस्कर स्थानांनी युक्त होती. संरक्षण आणि आक्रमण अशा दोन्ही दृष्टींनी ती अत्यंत महत्त्वाची मानली जात असे.

सुवेळा माची – पूर्वेकडे असलेली ही माची अरुंद व उग्र कड्यांवर पसरलेली आहे. येथे पाण्याची टाकी, पहारेकऱ्यांची ठाणी आणि गुप्त, अरुंद प्रवेशद्वार होते. शत्रूवर लक्ष ठेवण्यासाठी हे स्थान अनन्यसाधारण उपयोगी ठरत असे.

या तिन्ही माच्या एका ठिकाणी येऊन मिळतात – तो म्हणजे बालेकिल्ला. उंच मनोरे, भक्कम भिंती आणि विस्तीर्ण परिसरावर नजर ठेवणारा हा भाग म्हणजे गडाचा सर्वोच्च आणि अंतिम संरक्षणस्तर. गडाच्या प्रवेशासाठी पाली, गुंजवणे व अळू दरवाजा हे मार्ग वापरले जात. तसेच खडकात कोरलेल्या असंख्य टाक्यांमुळे पाणी व धान्यसाठा अखंड उपलब्ध राहावा याची काळजी घेण्यात आली होती.

### गडाचे वैशिष्ट्य

राजगडाच्या बांधणीत केवळ संरक्षणाचा विचार केलेला नव्हता, तर राजकारण, प्रशासन, सैनिक व्यवस्थापन आणि दीर्घकालीन टिकाऊपणा या सर्व बाबी लक्षात घेऊन गड उभारण्यात आला. वळणावळणाच्या पायवाटा, धान्यकोठारे, पहारेकऱ्यांच्या चौक्या यामुळे गड एक परिपूर्ण राजधानी ठरला.

### सांस्कृतिक वारसा

आजचा राजगड हा फक्त एक पुरातन अवशेष नाही, तर जिवंत वारशाचे प्रतीक आहे. येथे होणारे उत्सव गडाच्या ऐतिहासिक महत्त्वाची आठवण करून देतात. दिवाळीच्या वेळी होणारा दीपोत्सव संपूर्ण गडाला दिव्यांच्या उजेडात न्हाऊ घालतो. शिवजयंतीच्या दिवशी तर हजारो लोक गडावर जमतात. पारंपरिक वाद्ये, भाषणे, शिवचरित्रावर आधारित नाटिका यामुळे गड पुन्हा एकदा इतिहासाच्या सोनेरी क्षणात जगू लागतो.

### जागतिक ओळख

इतिहास, वास्तुकला, युद्धतंत्र आणि सांस्कृतिक महत्त्व यांचा अनोखा संगम असलेला राजगड आज युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या मालिकेत समाविष्ट होऊन भारताचे आणि मराठ्यांचे वैभव जगभर पोचवत आहे. राजगड किल्ला केवळ ऐतिहासिक वारसा नाही, तर तो एक साहस, एक प्रवास आणि मराठ्यांच्या अदम्य शौर्याला वाहिलेली आदरांजली आहे. येथील प्रत्येक दगड भूतकाळाच्या कथा सांगतो. इतिहासप्रेमींना येथे मराठ्यांच्या विजयगाथांचा अनुभव येतो. ट्रेकिंगच्या चाहत्यांसाठी हा किल्ला एक रोमांचक आहे. निसर्गप्रेमींना येथे सह्याद्रीच्या भव्य सौंदर्याचे दर्शन होते. येथील शांतता आणि वारा मनाला ताजेतवाने करतो. राजगड महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची आठवण करून देतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचे आणि पराक्रमाचे साक्षीदार असलेला हा किल्ला आजही दिमाखात उभा आहे. येथे आल्यावर प्रत्येक क्षण संस्मरणीय वाटतो. एकदा का तुम्ही येथे पोहोचलात, तर हा प्रवास केवळ एक ट्रेक राहणार नाही, तर तो एक ऐतिहासिक अनुभव बनून हृदयात कोरला जाईल. राजगड तुमची वाट पाहतो आहे, चला निघा गडांच्या राजाला भेट द्यायला!

✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻

- संजय डी.ओरके
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई

# आता हायड्रोजन बॉम्ब

इंडिया आघाडीच्या वतीने बिहारमध्ये गेले १७ दिवस सुरू असलेली 'व्होट अधिकार यात्रा' आज पाटण्यातील जाहीर सभेने समाप्त झाली. बिहारमध्ये सध्या जी एसआयआर प्रक्रिया सुरू आहे, त्यातील गडबड घोटाळे आणि एकूणच देशातील निवडणूक प्रक्रियेत जे घोटाळे झाले आहेत त्याविषयी जनतेत जागृती करण्यासाठी आणि लोकांचा मतांचा अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी ही व्होट अधिकार यात्रा काढण्यात आली. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी काढलेल्या या यात्रेला स्थानिक नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. गर्दीचा हा आकडा देशात राजकीय परिवर्तन घडवण्याचे संकेत देणारा आहे, असा विश्वास इंडिया आघाडीचे लोक व्यक्त करताना दिसतात. या संपूर्ण यात्रेत लोकांचा माताधिकार हे सरकार गैरमार्गाने कसा काढून घेत आहे याची माहिती हे नेते सामान्य जनतेला देताना दिसले. तुमचा मताचा अधिकार गेला की तुमचा या देशात नागरिक म्हणून राहण्याचा अधिकारसुद्धा जाऊ शकतो, तुम्हाला मिळणारे रेशन आणि पेन्शनसुद्धा बंद होऊ शकते, असा इशारा देत जनभावनेला साद घालण्याचा प्रयत्न या व्होट अधिकार यात्रेतून झाला. या यात्रेतून किती राजकीय परिवर्तन होईल हा भाग वेगळा, पण जनतेच्या मनात एकूणच निवडणूक प्रक्रियेविषयी संशयाचे वातावरण निर्माण करण्यात मात्र ही व्होट अधिकारी यात्रा बर्यापैकी यशस्वी ठरली, असे म्हणावे लागेल. राहुल गांधी यांनी आज पाटण्यात झालेल्या समारोप सभेत मोदी सरकारच्या विरोधात आता 'हायड्रोजन बॉम्ब' फोडण्याचा इशारा दिला आहे. त्यांनी म्हटले आहे की महादेवपुरा मतदारसंघातील मत चोरी उघडकीला आणून आम्ही अणुबॉम्ब फोडला होता, आता आम्ही देशाच्या विविध भागातील निवडणूक गैरव्यवहाराचा त्याहीपेक्षा मोठा धमाका करणार आहोत आणि हा धमाका अणुबॉम्बपेक्षासुद्धा मोठा म्हणजे हायड्रोजन बॉम्बसारखा असेल असे त्यांनी म्हटले आहे. आता लोकांना राहुल गांधी यांच्या या हायड्रोजन बॉम्बची प्रतीक्षा असेल.





अर्थात, तो हायड्रोजन बॉम्ब म्हणजे देशाच्या विविध भागात झालेल्या निवडणूक गैरव्यवहारांचाच पर्दाफाश असेल याचा अंदाज कोणीही बांधू शकतो. राहुल गांधी यांनी महादेवपुरा मतदारसंघातील मतचोरीचे जे पुरावे सादर केले होते, ते पुरावे निवडणूक आयोगाने मान्य करायला नकार दिला आहे. त्यानंतर आता देशातील सन २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये किमान ८० ठिकाणी गैरमार्गाने निवडणुकांचे निकाल फिरवण्यात आल्याचा दावाही राहुल गांधी यांनी अलीकडेच एका सभेत केला आहे. महाराष्ट्रात तर १००% मतचोरीचा प्रकार घडला आहे असे राहुल गांधी यांनी आज म्हटले आहे. त्यामुळे याच संदर्भातील सगळे पुरावे ते पुन्हा एकदा देतील आणि ते हायड्रोजन बॉम्बच्या क्षमतेचे असतील हा राहुल गांधी यांचा दावा काहीसा खळबळजनक वाटतो आहे. अर्थात, राहुल गांधी यांच्या या पुराव्यांना निवडणूक आयोग किती किंमत देते यावर बरेचसे अवलंबून आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर एक मूलभूत मुद्दा असा की मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया जर संशयास्पद असेल तर त्यातील संशय दूर करणे हे निवडणूक आयोगाचे प्राथमिक काम आहे ते त्यांनी प्रामाणिकपणे केले पाहिजे.

आपण जी निवडणूक प्रक्रिया राबवतो त्याविषयी लोकांनाच शंका येत असेल तर ते आपल्या प्रतिमेला मारक आहे याची जाणीव ठेवून निवडणूक आयोगाने तद्अनुरूप दुरुस्ती केली पाहिजे, पण निवडणूक आयोगच सध्या आडमुठ्या भूमिकेत गेलेला दिसतो आहे. त्यातून हे संशयाचे वर्तुळ आणखी गडद होत जाताना दिसते आहे. देशातील निवडणूक प्रक्रिया जर संशयाच्या भोवर्यात सापडणार असेल तर एकूणच लोकशाही प्रक्रियेला काही अर्थ उरत नाही. त्यामुळे हा संशय शक्य तितक्या लवकर दूर करून विरोधकांच्या आक्षेपांना समर्पक उत्तरे देण्याचे किंवा त्यांचे निराकरण करण्याचे काम निवडणूक आयोगाने तत्परतेने करण्याची गरज आहे. विरोधक आरोप करत राहणार, पुरावे देत राहणार आणि निवडणूक आयोग मात्र नकाराच्या भूमिकेतच राहणार असेल तर यातून देशातील एकूणच जनमानस विचलित होण्याचा धोका आहे

# पुन्हा होण्याचा धोका कमी करण्यासाठी ५ उपाय, तज्ज्ञांचा सल्ला

स्तनाचा कर्करोग माहिती

स्तनाचा कर्करोग पुन्हा होऊ नये यासाठी काय करावे

महिलांमध्ये वाढता आजार

स्तनाचा कर्करोग सर्वात सामान्य व प्राणघातक कर्करोग आहे, ज्याचा भारतातील महिलांवर परिणाम होतो. वाढती जागरूकता आणि वैद्यकीय प्रगतीमुळे भारतातील जवळपास ७६ टक्के स्तनाच्या कर्करोगाच्या केसेसचे आता सुरुवातीच्या टप्प्यात निदान होत आहे. सुरुवातीच्या टप्प्यातील स्तनाचा कर्करोग म्हणजे कर्करोगाची गाठ स्तनात किंवा जवळच्या लिम्फ नोड्समध्ये आढळते आणि शरीराच्या इतर भागात पसरलेली नसते. ते ०, १, २ किंवा ३ टप्प्यामधील असू शकते. पण यशस्वी उपचारानंतर देखील स्तनाचा कर्करोग पुन्हा होण्याचा धोका प्रमुख चिंतेचा विषय आहे.


नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, अर्ली ब्रेस्ट कॅन्सर (EBC)चे निदान झालेल्या जवळपास २० टक्के महिलांना १० वर्षांच्या आत पुन्हा स्तनाचा कर्करोग होण्याची शक्यता आहे. निदानाच्या वेळी वय, ट्यूमरचा आकार, कर्करोग असलेल्या लिम्फ नोड्सची संख्या, जनुकांमधील उत्परिवर्तन किंवा कर्करोग वाढण्यास कारणीभूत ठरू शकणाऱ्या जनुकांची असामान्य क्रिया यांसह अनेक घटकांमुळे ईबीसी असलेल्या प्रत्येक महिलेला स्तनाचा कर्करोग पुन्हा होण्याचा धोका वेगळा असतो. जोखीम समजून घेणे आणि पुढील उपाययोजनांबाबत स्पष्ट जाणीव असणे हे स्तनाचा कर्करोगामधून वाचलेल्यांना आत्मविश्वासाने जीवन जगण्यास मदत करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

बदललेला दृष्टीकोन

सुदैवाने, वैद्यकीय प्रगतीमुळे स्तनाच्या कर्करोगातून वाचलेल्यांसाठी दृष्टिकोन बदलत आहे. हार्मोन-आधारित उपचारांसह आरोग्यदायी उतींना वाचवून कर्करोगाच्या पेशींना लक्ष्य करणारे अत्याधुनिक लक्ष्यित उपचार केले जात आहेत. तसेच, अल्पावधीत स्तनाचा कर्करोग नियंत्रित करण्याऐवजी दीर्घकाळापर्यंत स्तनाचा कर्करोग पुन्हा होण्याच्या शक्यतेला कमी करण्यावर, तसेच दीर्घकाळापर्यंत जीवनाचा दर्जा उत्तम राहण्यावर लक्ष केंद्रित केले जात आहे. परिणामत: अधिकाधिक महिलांना दीर्घकाळापर्यंत उत्तमरित्या जीवन जगता येते.

काय सांगतात तज्ज्ञ सर एचएन रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या मेडिकल अँड प्रिसिजन ऑन्कोलॉजीच्या संचालिका आणि ऑन्कोलॉजी रिसर्चच्या संचालिका डॉ. सेवंती लिमये म्हणाल्या, सुरुवातीच्या टप्प्यावरील ब्रेस्ट कॅन्सर पूर्णपणे बरा होऊ शकतो, असा सामान्य समज आहे. प्रत्यक्षात, लवकर निदान झाल्यानंतर देखील स्तनाचा कर्करोग पुन्हा होण्याचा धोका कायम असतो, कधी-कधी ५० टक्क्यांपर्यंत शक्यता असू शकते. म्हणून, प्रत्येक रुग्णाने प्रगत थेरपी पर्यायांबद्दल सतत दक्ष राहणे आणि चर्चा करणे महत्त्वाचे आहे. तुमचा वैयक्तिक धोका समजून घेऊन आणि तुमच्या काळजी घेणाऱ्या टीमसोबत एकत्रित काम करून तुम्ही स्तनाचा कर्करोग पुन्हा होण्याची शक्यता कमी करण्यासाठी आणि दीर्घकाळापर्यंत आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी सक्रिय पावले उचलू शकता.





अधिक जाणून घ्या आरोग्यदायी वजन आणि सक्रिय शारीरिक जीवनशैली राखा शरीराचे जास्त वजन आणि निष्क्रिय शारीरिक जीवनशैलीमुळे स्तनाचा कर्करोग होण्याचा धोका वाढू शकतो. नियमित व्यायाम आणि आरोग्यदायी वजन राखणे यामुळे हार्मोन्स नियंत्रित करण्यास मदत होते, जळजळ कमी होते आणि एकूण आरोग्य उत्तम राहते. फळे, भाज्या, संपूर्ण धान्य आणि लीन प्रोटीन असलेल्या संतुलित आहाराचे सेवन केल्याने वजनाचे व्यवस्थापन करण्यास मदत होऊ शकते. हे सर्व घटक स्तनाचा कर्करोग पुन्हा होण्याची शक्यता कमी करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजातवत.

नियमित फॉलो-अप घेत तपासणी करा

स्तनाचा कर्करोग पुन्हा होण्याबाबत लवकर निदान केल्यास अधिक प्रभावी उपचार करता येऊ शकतात आणि उत्तम निष्पत्तींची खात्री मिळते. इमेजिंग, प्रयोगशाळेत चाचण्या व प्रत्यक्ष तपासणीसाठी फॉलो-अप वेळापत्रकाचे पालन केल्यास कोणतेही बदल लवकर ओळखण्यास मदत होते. तुम्हाला गाठी, वेदना किंवा अस्पष्ट थकवा यांसारखी कोणतीही नवीन लक्षणे दिसली तर विलंब न करता वैद्यकीय सल्ला घेणे महत्वाचे आहे.

प्रगत उपचारांबद्दल डॉक्टरांचा सल्ला घ्या

अर्ली ब्रेस्ट कॅन्सरसह निदान झालेल्या महिलांसाठी हार्मोन-आधारित औषधे आणि लक्ष्यित उपचारांसह प्रगत उपचारांमुळे जीवनाचा दर्जा कायम राखत स्तनाचा कर्करोग पुन्हा होण्याचा धोका कमी होऊ शकतो. भारतात अजूनही केअर सर्विस उपलब्ध असण्याचे प्रमाण आणि जागरूकता वाढत आहे, ज्यामुळे फक्त जगण्याबाबत नाही तर जीवन जगण्याच्या पद्धतीबाबत देखील चर्चा होणे महत्त्वाचे आहे. यशस्वी उपचारासह दीर्घकाळापर्यंत काळजी, मानसिक आरोग्य व जीवनाचा दर्जा यांना देखील प्राधान्य दिले पाहिजे. रुग्णांना 'माझ्यासाठी कोणते प्रगत उपचार पर्याय आहेत?' अशी प्रश्न विचारण्यास प्रेरित केले पाहिजे.

मानसिक आणि भावनिक आरोग्य उत्तम राखण्याला प्राधान्य द्या

भावनिक आरोग्य उत्तम असणे शारीरिक रिकव्हरी आणि दीर्घकाळापर्यंत जगण्यासाठी महत्त्वाचे आहे. सामाजिक पाठिंबा, समुपदेशन व तणाव व्यवस्थापन यामुळे जीवनचा दर्जा मोठ्या प्रमाणात सुधारू शकतो, तसेच स्तनाचा कर्करोग पुन्हा होण्याचा धोका देखील कमी होऊ शकतो. चिंता, नैराश्य किंवा स्तनाचा कर्करोग पुन्हा होण्याची भिती जाणवत असेल तर मानसिक आरोग्य तज्ज्ञांचा सल्ला घेण्यास अजिबात संकोच करू नका.

तंबाखूचे सेवन टाळा आणि मद्यपान मर्यादित करा

धूम्रपान आणि जास्त मद्यपान केल्याने स्तनाचा कर्करोग पुन्हा होण्याचा धोका वाढू शकतो. तुम्ही धूम्रपान करत असाल तर समुपदेशन किंवा इतर उपक्रमांच्या माध्यमातून धूम्रपान सोडण्यासाठी मदत घ्या. मद्यपान मर्यादित करा किंवा शक्य असल्यास पूर्णपणे टाळा. हे धोके कमी करण्याबाबत वैयक्तिक मार्गदर्शनासाठी तुमच्या केअर टीमसोबत याबाबत चर्चा करा.

स्तनाचा कर्करोग पुन्हा होण्याचा धोका वास्तविक आहे, पण दक्षता, थेरपीचे पालन आणि आरोग्यासाठी व्यापक दृष्टिकोन यांद्वारे त्याचे व्यवस्थापन केले जाऊ शकते. तुमच्या केअर टीमसोबत सल्लामसलत करा, प्रगत उपचारांबद्दल चर्चा करा, जीवनशैलीच्या निवडींबाबत सक्रिय राहा आणि शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम ठेवण्याला प्राधान्य द्या. अशी सक्रिय पावले उचलत तुम्ही स्तनाचा कर्करोग होण्याचा धोका कमी करू शकता आणि आरोग्यदायी जीवन जगू शकता F-Qs (संबंधित प्रश्न)

१. स्तनाचा कर्करोग कसा ओळखायचा? स्तनाच्या कर्करोगाची तपासणी करण्यासाठी मॅमोग्राम सामान्यतः वापरले जातात . अधिक तपशीलवार मॅमोग्रामला डायग्नोस्टिक मॅमोग्राम असे म्हटले जाते

२. स्तनाच्या कर्करोगाचे रुग्ण किती काळ जगतात? NCI च्या अहवालानुसार स्तनाच्या कर्करोगाने ग्रस्त असलेल्या ९०.८% महिला निदानानंतर साधारण ५ वर्षे जगतात

३. कोणते कर्करोग १००% बरे होऊ शकतात? प्रोस्टेट, थायरॉईड, टेस्टिक्युलर, मेलेनोमा, स्तनाचे कर्करोग योग्य उपाय मिळाल्यास बरे होतात

# घेतला मुलांसाठी 'मोठा' निर्णय, का नाही घेत आहे आयांची मदत

अमेरिकेत स्थलांतरित झाल्यापासून इलियाना डिक्रूझने आपल्याविषयी फारसे बोलणे टाळले आहे, कारण सध्या ती स्वतःच्या मुलांचे संगोपन करण्यास प्राधान्य देत असल्याचे दिसून येत आहे. या अभिनेत्रीचे लग्न मायकेल डोलनशी झाले आहे आणि ती तिच्या दोन मुलांसह ह्युस्टन, टेक्सास येथे राहते. तिचा मुलगा कोआ फिनिक्स डोलनचा जन्म १ ऑगस्ट २०२३ रोजी झाला आणि तिचा दुसरा मुलगा कीनू राफे डोलनचा जन्म १९ जून २०२५ रोजी झाला आहे.





मुलांना स्वतः वाढवण्याचा निर्णय ३० ऑगस्ट रोजी, इलियाना डिक्रूझने अभिनेत्री नेहा धुपियाशी तिच्या आई होण्याच्या प्रवासाचा आनंद घेतल्याबद्दल चर्चा केली. इलियानाने खुलासा केला की तिला आया ठेवायची नव्हती आणि ती थकलेली असतानाही स्वतः तिच्या मुलांची काळजी घेण्यास प्राधान्य देत आहे. इलियानाने सांगितले की तिचा सक्रिय पालक असण्यावर अधिक विश्वास आहे आणि तिच्या मुलांच्या दैनंदिन जीवनापासून दूर करण्याची तिची अजिबात इच्छा नाही. तिने आणि तिचा पती त्यांच्या व्यस्त जीवनात असूनही मुलांची स्वतः काळजी का घेतात हे स्पष्ट केले.

आयांची मदत का घेत नाही? पती मायकल डोलनसोबत तिच्या दोन्ही मुलांना वाढवण्याच्या अनुभवाबद्दल विचारले असता, अभिनेत्रीने सांगितले की ते दोघेही सक्रिय पालक आहेत. ती म्हणाली, आमच्याकडे मदतनीस नाहीत आणि मुंबईत असण्याची चांगली गोष्ट म्हणजे तुम्हाला खूप मदत मिळते. आणि तुमच्याकडे खूप काही उपलब्ध आहे, जसे की, तुम्हाला माहिती आहे, माझे मित्रमैत्रिणी तिथे आहेत आणि खरं तर मुंबई हे ह्युस्टनपेक्षाही घरासारखे आहे. पण मला वाटते की इथे अमेरिकेत असण्याची सर्वात चांगली गोष्ट म्हणजे सर्वकाही एकांतात आहे. माझ्या स्वतःच्या छोट्याशा लहानशा जगात असणे खूप छान आहे.

पतीकडून पूर्ण पाठिंबा इलियाना पुढे म्हणाली की, प्रत्येक आईला माइक (मायकल डोलन) सारखाच आधार देणारा जोडीदार असावा असे मला खरोखर वाटते, कारण तो पहिल्या दिवसापासून प्रत्येक परिस्थितीत माझ्यासोबत आहे. त्याने मला बसवले आणि म्हटले, 'जर तुला मदत हवी असेल तर आपण मार्ग शोधून काढू. आपल्याला मदत मिळेल. आपण थेरपी घेऊ. जर तुला एखाद्या नॅनीची गरज असेल तर आपण तशी व्यवस्था करू शकतो.' मी त्यावर त्याला उत्तर दिलं की, 'नाही, आपल्याला आया नको आहे. मला अजिबात नको.' म्हणून, मला वाटते की आमचं आयुष्य अधिक सुंदर आहे.

शेवटी, मदतीशिवाय आणि आयाशिवाय मुलांना वाढवणे चांगले की वाईट हे स्वतःच्या परिस्थिती, मूल्ये आणि प्राधान्यांवर अवलंबून असते. परंतु इलियानाच्या मते, सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे कुटुंबासाठी पालक आणि मुले दोघांच्याही कल्याणात मदत करणारा समतोल निर्माण करणे गरजेचे आहे. ती म्हणाली की तिला वाटते की ती तिच्या मुलांच्या दैनंदिन जीवनात अधिक सहभागी होऊ शकते, निर्णय घेऊ शकते आणि त्यांना योग्य मूल्ये शिकवू शकते.

एक जबाबदार आई होण्याची इच्छा इलियाना डिक्रूझ म्हणाली, मला वाटतं कुठेतरी मला एक जबाबदार आई व्हायचं होतं आणि हो, कदाचित आपल्याकडे इथे (अमेरिकेत) एक आया असण्याचा पर्याय असेल, पण मला ते करायचं नव्हतं. आणि मला वाटतं की ते अशा ठिकाणाहून येतं जिथे मला सगळं इतरांवर सोडून देण्याची खूप भीती वाटते. विशेष म्हणजे माझ्या मुलांवर लक्ष ठेवणं आणि त्यांची काळजी घेणं आणि मला वाटतं की गोष्टी एका विशिष्ट पद्धतीने करायच्या आहेत. आणि मला वाटतं की लोकांना ते समजणार नाही.' मी ते सध्या व्यवस्थित सांभाळत आहे असं मला वाटतं हे देखील तिने आवर्जून या मुलाखतीमध्ये सांगितले आहे. नव्या पालकांनी इलियानाकडून बरंच काही शिकण्यासारखे आहे.

## उष्णतेमुळे चेहऱ्यावर पिंपल्स आले आहेत? मग 'या' पद्धतीने त्वचेवर लावा चंदन, त्वचा होईल मुलायम आणि सॉफ्ट

वर्षाच्या बाराही महिने काहींना शरीरात पित्त दोष किंवा वातावरणात होणाऱ्या बदलांमुळे उष्णता वाढते. शरीरात उष्णता वाढल्यानंतर पोटात जळजळ होणे, त्वचेमध्ये वाढलेली जळजळ किंवा शरीराच्या कोणत्याही अवयवाला जळजळ होते. त्वचेमध्ये वाढलेल्या उष्णतेमुळे चेहऱ्यावर सतत पिंपल्स येणे, मुरूम,फोड किंवा इतर समस्या उद्भवू लागतात. या सर्वच समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी चंदनाचा वापर करावा. मागील अनेक वर्षांपासून महिला त्वचेच्या समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी चंदनाचा वापर करत आहेत. औषधी आणि आयुर्वेदिक गुणधर्मांनी समृद्ध असलेले चंदन त्वचा सुंदर आणि डागविरहित करण्यासाठी मदत करते. चंदनाचा लेप चेहऱ्यावर लावल्यानंतर त्वचेला अतिशय थंड वाटते.

लाकड्याच्या काड्यांपासून चंदन पावडर तयार केली जाते. महागडे स्किन केअर प्रॉडक्ट, साबण, क्रीम, फेस पॅक, अगरबत्ती, अत्तर इत्यादी अनेक गोष्टी बनवण्यासाठी चंदन पावडरचा वापर केला जातो. यामध्ये जंतूनाशक, दाहशामक, थंडावा देणारे आणि सौंदर्यवर्धक गुणधर्म आढळून येतात. त्यामुळे त्वचेमध्ये वाढलेली जळजळ कमी करण्यासाठी कोणत्याही केमिकलयुक्त स्किन केअर प्रॉडक्टचा वापर न करता चंदन पावडरचा वापर करावा. आज आम्ही तुम्हाला चंदन लावण्याची सोपी पद्धत सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया. कोणत्याही दुकानात चंदन पावडर सहज उपलब्ध होते. वाटीमध्ये चंदन पावडर घेऊन त्यात गुलाब पाणी टाकून मिक्स करा. तयार केलेले मिश्रण संपूर्ण चेहऱ्यावर लावून काहीवेळ तसेच ठेवून द्या. त्यानंतर त्वचा पाण्याने स्वच्छ धुवून घ्या.उष्णतेमुळे त्वचेवर आलेले पिंपल्स कमी होतील आणि चेहरा उजळदार दिसेल. त्वचेच्या सर्वच समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी चंदन पावडरचा वापर करावा. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये काहींची त्वचा अतिशय चिकट आणि तेलकट होऊन जाते. अशावेळी त्वचेवर वाढलेले अतिरिक्त तेल कमी करण्यासाठी चंदन फेसपॅक बनवून लावावा. यामुळे त्वचेवरील तेल कमी होईल.


## सकाळी उपाशीपोटी १ ग्लास पाण्यातून तूप पिण्याने काय होते? बाबा रामदेवांनी सांगितले फायदे

आरोग्यासाठी तुपाचे फायदे

बाबा रामदेव यांनी आरोग्यासाठी तूप कसे खावे सांगितले

सकाळी रिकाम्या पोटी पाण्यातून खावे तूप





आयुर्वेदात तूप अमृत मानले जाते. योगगुरू बाबा रामदेव यांनी ते तुमच्या दैनंदिन दिनचर्येत समाविष्ट करण्याचा सल्ला दिला आहे. सकाळी रिकाम्या पोटी १ ग्लास कोमट पाण्यात एक चमचा देशी तूप मिसळून प्यायल्याने शरीर आतून मजबूत होते असे त्यांचे मत आहे. तुपामुळे केवळ पचन सुधारत नाही तर शरीरातील हानिकारक विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करते, ज्यामुळे त्वचा चमकदार होते आणि मन तीक्ष्ण होते.

तूप हे निरोगी गुणधर्मांचे भांडार आहे आणि याशिवाय तूप हे चांगल्या चरबीचा स्रोत आहे. त्यात जीवनसत्त्वे ए, डी, ई, के, अँटीऑक्सिडंट्स आणि निरोगी चरबी असतात. तूपात दाहक गुणधर्म असतात, जे दाह कमी करतात. शुद्ध देशी तूप रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. बाबा रामदेव म्हणतात की देशी तूप खाल्ल्याने मेंदूचे आरोग्यदेखील सुधारते. देशी तूप मिक्स करून पाणी पिण्याचे फायदे जाणून घेऊया. कोमट पाण्यात मिसळून तूप खाण्याचे ५ फायदे मेंदूच्या आजारांपासून संरक्षण - बाबा रामदेव म्हणतात की देशी तूप खाल्ल्याने कधीही मेंदूचे आजार होणार नाहीत. तूप आपली स्मरणशक्ती वाढवते आणि आपली विचारशक्ती तीक्ष्ण करते. पार्किन्सन, डिमेंशिया आणि अल्झायमरसारखे आजारही होणार नाहीत

डोळ्यांच्या समस्यांपासून दूर - देशी तूप खाल्ल्याने डोळ्यांचा त्रास कधीच होणार नाही. डोळे कोरडे होणे, डोळ्यांत जळजळ होणे, खाज सुटणे किंवा संसर्ग तुम्हाला कधीच लवकर घेरणार नाही

त्वचेच्या समस्यांपासून बचाव - जर एखाद्याला कोरड्या निर्जीव त्वचेचा त्रास असेल तर त्यांनी पाण्यात मिसळून देसी तूप खावे स्नायूंना बळकटी देणे - शारीरिकदृष्ट्या कमकुवत लोकांनी आपल्या आहारात देसी तूपाचा समावेश करावा. तूप हे एक चांगले फॅट आहे, जे स्नायू आणि हाडे मजबूत करते आणि वेदना इत्यादी समस्यांपासून आराम देते रोगप्रतिकारशक्ती - देशी तूप खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती खूप चांगली राहते. हे एक सुपर इम्युनिटी बूस्टर फूड मानले जाते, जे दररोज खाल्ल्यास आजारांपासून दूर राहते. देशी तूप खाण्याचा योग्य मार्ग कोणता आहे? अधिक जाणून घ्या बऱ्याचदा लोक रोटीसोबत तूप खातात, जे ते खाण्याचा योग्य मार्ग नाही. रोटीवर तूप लावून खाल्ल्याने तूप लवकर पचत नाही, ज्यामुळे अपचन आणि गॅस होऊ शकतो. अशा प्रकारे तूप खाल्ल्याने शरीराला त्याचे पुरेसे फायदे मिळत नाहीत. कोमट पाण्यात मिसळून तूप प्यायल्याने चयापचय क्रिया मजबूत होते. आपल्या शरीराला सकाळी चांगल्या चरबीची आवश्यकता असते, त्यासाठी देशी तूप हा सर्वोत्तम पर्याय आहे.

## हिरवीगार तुळशीची पाने आरोग्यासाठी ठरतील वरदान! 'या' पद्धतीने करा वापर, झपाट्याने वाढेल रोगप्रतिकारशक्ती

प्रत्येक घराच्या अंगणात एक तरी तुळशीचे रोप असतेच. तुळशीच्या पानांना धार्मिक दृष्ट्या खूप जास्त महत्व आहे. तुळशीच्या पानांचा वापर पूजेमध्ये केला जातो. याशिवाय औषधी गुणधर्मांनी समृद्ध असलेली तुळशीची पाने आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. नियमित तुळशीचे एक पान चावून खाल्यास शरीरसंबंधित अनेक समस्यांपासून सुटका मिळेल. ही पाने जंतूनाशक, विषाणूनाशक, दाहशामक, अँण्टी ऑक्सिडंट्स आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी गुणकारी ठरतात. महिला तुळशीच्या पानांचा रस काढून त्वचेवर लावतात, ज्यामुळे पिंपल्स आणि डागांपासून सुटका मिळते. त्वचेसंबंधित सर्वच समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी तुळशीची पाने प्रभावी ठरतील. चेहऱ्यावर आलेले फोड, मुरूम किंवा पुरळ, खाज, लाल रॅश कमी करण्यासाठी तुळशीच्या पानांचा वापर केला जातो.




शरीराच्या कोणत्याही अवयवाला अचानक आलेली सूज कमी करण्यासाठी तुळशीच्या पानांचा रस काढून सेवन करण्यास दिला जातो. यामुळे सूज कमी होण्यास मदत होते. त्वचेमध्ये वाढलेली उष्णता कमी करण्यासाठी तुळशीच्या पानांचा रस प्यावा. यामुळे जखमा लवकर भरतात. आयुर्वेदिक गुणधर्मांनी समृद्ध असलेली तुळशीचे पाने शरीरातील गंभीर आजारांपासून सुटका मिळवून देतात. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये त्वचेवर वाढलेला रेडनेस कमी करण्यासाठी तुळशीच्या पानांचा लेप लावावा. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये सर्दी, खोकला किंवा आरोग्यासंबंधित इतर समस्या उद्भवू लागल्यास तुळशीच्या काढ्याचे सेवन करावे. हा काढा शरीरातील विषारी घटक बाहेर काढून टाकण्यासाठी मदत करतो. घशात वाढलेली खवखव दूर करण्यासाठी तुळशीच्या काढ्याचे सेवन करावे. दमा, श्वसनमार्गातील अडथळे दूर करण्यासाठी तुळशीच्या काढ्याचे सेवन करावे.

## चेहऱ्यावर आलेल्या सुरकुत्या, डाग कमी करण्यासाठी 'या' फळांच्या सालींचा करा वापर, भाग्यश्रीने दिलेल्या टिप्स ठरतील प्रभावी

सकाळच्या नाश्त्यात किंवा इतर वेळी फळांचे सेवन केल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. दीर्घकाळ निरोगी राहण्यासाठी आहारात नियमित हंगामी फळांचे सेवन करावे. फळे खाल्ल्यानंतर फळांच्या साली फेकून दिल्या जातात. पण याच सालींचा वापर तुम्ही त्वचा अधिक सुंदर आणि चमकदार करण्यासाठी करू शकता. फळांच्या सालींचा वापर आरोग्यासंबंधित अनेक समस्यांपासून सुटका मिळवून देण्यासाठी केला जातो. डाळिंब, केळी किंवा संत्र्याची साल काढून फेकून दिली जाते. पण असे न करता या सालींचा वापर करून तुम्ही फेसपॅक किंवा फेसमास्क बनवू शकता. अभिनेत्री भाग्यश्री तिच्या सोशल मीडियावर स्किन केअर, हेल्थ, हेअर केअर इत्यादीबद्दल सतत काहींना काही शेअर करत असते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला अभिनेत्री भाग्यश्रीने फळांच्या सालींचा वापर करून फेसपॅक बनवण्याची सोपी कृती सांगितली आहे. चला तर जाणून घेऊया सविस्तर.

बऱ्याचदा धावपळीच्या जीवनशैलीमुळे आरोग्य आणि त्वचेकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नाही. सतत काम करत राहिल्यामुळे त्वचेकडे दुर्लक्ष होते. यामुळे काहीवेळा डोळ्यांखाली काळी वर्तुळ किंवा सुरकुत्या येण्याची शक्यता असते. या समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी महिला अनेक वेगवेगळ्या स्किन केअर प्रॉडक्टचा वापर करतात. पण असे न करता घरगुती उपाय करून त्वचेची काळजी घ्यावी.



त्वचेच्या समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी केळीच्या सालीचा वापर करावा. यामुळे चेहऱ्यावर वाढलेल्या सुरकुत्या कमी होतात.

डार्क सर्कल्स आणि सुरकुत्यांसाठी केळ्याच्या सालीचा वापर: सर्वच महिलांच्या चेहऱ्यावर डार्क सर्कल्स असतात. हे डार्क सर्कल्स कमी करण्यासाठी वेगवेगळ्या क्रीम किंवा मास्क लावले जातात. पण तरीसुद्धा त्वचा उजळदार दिसत नाही. अशावेळी फळांच्या सालींचा वापर करावा. केळीच्या सालींचा मास्क बनवण्यासाठी सर्वप्रथम, केळीची साल मिक्सरच्या भांड्यात टाकून बारीक वाटून पेस्ट तयार करा. तयार केलेली पेस्ट वाटीमध्ये काढून त्यात हळद, साखर घालून स्क्रब तयार करा. तयार केलेला स्क्रब संपूर्ण त्वचेवर लावून हलक्या हाताने मसाज करून घ्या. त्यानंतर काहीवेळ तसेच ठेवून त्वचा पाण्याने स्वच्छ करून घ्या. यामुळे त्वचेवर डेड स्किन कमी होते आणि चेहरा सुंदर दिसतो. त्वचेच्या समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी केळीची साल अतिशय गुणकारी आहे.

# गणेश विसर्जन मिरवणूक मार्गाची मनपा उपायुक्त डॉ. खानसोळे व अधिकाऱ्यांकडून पाहणी





लातूर/ प्रतिनिधी :- शनिवार दि. ६ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन होणार आहे.यानिमित्त मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे व अधिकाऱ्यांनी विसर्जन मिरवणूक मार्गाची पाहणी केली.

मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या सूचनेनुसार उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी गंजगोलाई, सुभाष चौक, खडक हनुमान,तेली गल्ली, सिद्धेश्वर मंदिर या मार्गाची चालत जाऊन पाहणी केली. दरवर्षी मनपाच्या वतीने शहरात १५ ठिकाणी व विमानतळ परिसरात मूर्ती संकलन केंद्र उभारले जाते. यापैकी खंदाडे नगर, शासकीय कॉलनी, बांधकाम भवन येथील मूर्ती संकलन केंद्र परिसराचीही डॉ.खानसोळे यांनी पाहणी केली.

मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, क्षेत्रीय अधिकारी समाधान सूर्यवंशी, विजय राजुरे, विद्युत विभाग प्रमुख जरीचंद ताकपिरे,अग्निशमन अधिकारी गणेश चौधरी, प्रमुख स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे,अक्रम शेख, धोंडीबा सोनवणे, शिवराज शिंदे यावेळी उपस्थित होते.

विसर्जन मिरवणूक मार्गावर तसेच संकलन केंद्र परिसरात स्वच्छता करावी तसेच मिरवणूक मार्गावर येणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडण्याच्या सूचना यावेळी उपायुक्तांनी केल्या. रस्त्यावरील खड्डे बुजविणे, विद्युत व्यवस्था, विजेच्या तारा यांचीही त्यांनी पाहणी केली. मागील काही वर्षापासून शहरातील नागरिक आपल्या घरी स्थापन केलेल्या गणेश मूर्ती संकलन केंद्रावर आणून देत आहेत. शहरातील नागरिकांनी यावर्षीही या उपक्रमास सहकार्य करत आपल्या गणेश मूर्ती संकलन केंद्रावर आणून देण्याचे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## केज तालुक्यातील वरपगाव येथील ग्रामस्थांचा भव्य कॅन्डलमार्च संपन्न



केज/प्रतिनिधी तालुक्यातील वरपगाव येथे मंगळवारी सायंकाळी मराठ सेवक सतीश ज्ञानोबा देशमुख यांना श्रद्धांजली देण्यासाठी गावातून कॅन्डलमार्च काढण्यात आला. वरपगावच्या सतीश देशमुख यांचा मुंबई आंदोलनात सहभागी होऊन जात असताना शिवनेरी मुक्कामानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी प्रवासादरम्यान रक्तदाब वाढल्याने मृत्यू झाला होता. त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी या घटनेवर दुःख व्यक्त केले होते. त्यांनी कुटुंबाप्रती संवेदना व्यक्त करून सतीश देशमुख यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही असे म्हटले होते. आम्ही यशस्वी होऊनच परत येऊ असा आत्मविश्वास व निर्धार व्यक्त केला होता. आंदोलन संपल्यानंतर वरपगाव येथे जाऊन सतीश देशमुख यांच्या परिवाराची भेट घेणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. शासनाने सतीश देशमुख सह आंदोलनात बळी गेलेल्या आंदोलकांच्या परिवारातील किमान एका नातेवाईकाला सरकारी नोकरीत सामावून घ्यावे अशी मागणीही शासनाकडे केलेली आहे. मंगळवारी शासनाने मागण्या मान्य करताच वरपगावच्या ग्रामस्थानी सायंकाळी ७-०० वाजता गावातून भव्य केंडलमार्चचे आयोजन केले. यावेळी 'भारत माता की,जय जिजाऊ जय शिवराय, मनोज दादा तुम आगे बडो, वंदे मातरम्, सतीश देशमुख अमर रहे, अमर रहे! यासारख्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता. त्यानंतर गावच्या हनुमान मंदिर परिसरात काही वक्त्यांनी भाषने झाली व राष्ट्रगीताने कार्यक्रम संपला. यावेळी गावातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## अनोळखी मयताबाबत माहिती देण्याचे आवाहन

लातूर :- लातूर येथील विवेकानंद चौक पोलीस स्टेशन अंतर्गत कोळपा तांडा येथे रेल्वे पटरीवर ३० ऑगस्ट २०२५ रोजी अज्ञात रेल्वेने अपघात होवून पडल्याचे आढळून आले होते. त्याला लातूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असता, त्याला वैद्यकीय अधिकारी यांनी मृत घोषित केले. या मयताचा मरणोत्तर पंचनामा, शवविच्छेदन करून प्रेत शीतगृहात ठेवण्यात आले आहे मयताचे वय अंदाजे ३० वर्षे असून रंग गोरा, उंची अंदाजे ५ फुट ६ इंच, सडपातळ बांधा, सरळ नाक, अंगात मळकट झालेला पांढरा शर्ट व काळ्या रंगाची हाफपँट आहे. तरी या वर्णनाचा व्यक्तीबाबत काही माहिती मिळाल्यास लातूर येथील विवेकानंद चौक पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक एस.एस. पाटील (मो.क्र. ९९२३८७१९९९), पोलीस चौकशी अधिकारी एन. एन. वाघमारे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मनपा मधुन सेवानिवृत्त कर्मचारी सय्यद इनायतअली शेरअली निरोप समारंभ संपन्न



लातूर :-- लातूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागातील सय्यद इनायतअली शेरअली नुकतेच सेवानिवृत झाल्याने नांदेड नाका जलकुंभ येथील सर्व कर्मच्याऱ्यांच्या वतीने शाल, श्रीफळ, हार, पुष्पगुच्छ, फेटा व घडी देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून क्षत्रिय अधिकारी श्री. समाधान सुर्यवंशी शाखा अभियंता श्री.प्रविण राजे श्री.तबरेज पठान लातुर शहर जलप्रमुख श्री.जलील शेख, मनपा कर्मचारी संघटना अध्यक्ष अकुंश गायकवाड , शेख अकबर ,हरके अप्पा ,लातुर पूर्व भाग कृती समितीचे अध्यक्ष दिपक गंगणे उपस्थित होते या वेळी समाधान सुर्यवंशी यांनी इनायतअली यांनी पाणी पुरवठा विभागात केलेल्या कामाचे कौतुक करून पुढील आयुष्य करिता शुभेच्छा दिल्या सुरुवातीला प्रस्ताविकात स्वामी विवेकानंद जलकुंभ प्रमुख दिलीप गायकवाड यांनी भाषणात सय्यद इनायतअली यांनी पाणी पुरवठा विभागात विविध प्रभागात पाणी पुरवठा करताना दिलेल्या वेळेत ज्या भागात इतर पाणी पुरवठा कर्मचारी काम करण्यास नकार देत त्या प्रभागात नागरिकांच्या विना तक्रार पाणी केले असल्याचे सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कचरू कांबळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन महमंद पठाण यांनी मानले या वेळी नामदेव कांबळे तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता शोभीत गायकवाड , अमोल कांबळे, विश्वजीत कांबळे, व इरफान शेख , विजय बोणे , शिलवंत बनसोडे यांनी परिश्रम घेतले या वेळी डाल्डा व स्वामी विवेकानंद , नांदेड नाका जलकुंभ कर्मचारी व मनपातील विविध विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिल्लीला एक दिवस पश्चात्ताप करावा लागेल ; फारुख अब्दुल्ला असं का म्हणाले?, वाचा सविस्तर

जम्मू-काश्मीर संबंधी संविधानातून कलम ३७० काढून टाकण्याच्या निर्णयाला सध्या ५ वर्षे झाली आहेत, परंतु विरोधी पक्ष अजूनही त्याच्या विरोधात उभा आहे. अलिकडेच नॅशनल कॉन्फरन्स (एनसी) चे अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांनी यासंदर्भात एक मोठे विधान केले आहे.

फारुख अब्दुल्ला यांनी,केंद्र सरकारने जम्मू आणि काश्मीरला राज्याचा दर्जा वेळेत परत करावा, अन्यथा नवी दिल्लीला आपल्या निर्णयांवर पश्चात्ताप करावा लागेल. असे म्हटले आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, ऑगस्ट २०१९ नंतर घेतलेल्या एकतर्फी निर्णयांमुळे लोकांमध्ये विश्वास निर्माण होण्याऐवजी अंतर वाढले आहे.

## प्रणिता ढोबळे यांना लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय स्त्री शक्ती पुरस्काराने सन्मानित






नवी दिल्ली / प्रतिनिधी :- प्रणिता प्रदीप ढोबळे (नीलिमा अजाबराव मानकर) ह्यांना स्फुटक लेखन, अनुवादक आणि नाट्यनिर्मिती हया क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल भारताचे माजी प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय स्त्री शक्ती सन्मान पुरस्कार बहाल करून सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार दि.३० आगष्ट २०२५ रोजी ( कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया, निव दिल्ली ) येथे आयोजित २५ व्या गंतव्य राष्ट्रीय सन्मान समारोहात भारताचे माजी पंतप्रधान: लाल बहादूर शास्त्री यांचे सुपुत्र : सुनील शास्त्री यांचे शुभ हस्ते प्रदान करण्यात आला.

ह्याप्रसंगी बोलतानी मा. सुनील शास्त्री ह्यांनी लालबहादुर शास्त्री ह्यांचा ब्रीदवाक्यास जोड देत आज जय जवान जय किसान जय इंसान म्हणण्याची गरज आहे असे उल्लेखले. आजच्या जगात इंसानियत अतिशय खालच्या स्तरावर गेल्यांमुळे जय इंसान चा जागर करणे ही जरुरीचे आहे असे म्हटले. स्त्री ही अर्धांगिनी नसून पूर्णांगिनी आहे आणि आपली आई ललिता शास्त्री ह्याच्या सहकार्यामुळेच लालबहादुर शास्त्री हे प्रधानमंत्री बनू शकले हे त्यांनी आवर्जून सांगितले. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे स्त्रीचा असलेला सहभाग हा अधिक उजागर व्हावा म्हणूनच आम्ही प्रत्येक वर्षी राष्ट्रीय स्त्री शक्ती सन्मान पुरस्कार देतो असे त्यांनी सांगितले. भारतातील अनेक लेखकांनी लालबहादुर शस्त्री प्रधानमंत्री होते म्हणून त्यांच्यावर पुस्तके लिहिली परंतु मी माझ्या आई ललिता शास्त्री वर पुस्तक लिहित आहे हे त्यांनी सांगितले. माझ्या वडला सारखीच माझी आई तेवढीच महान होती हे मला जगाला सांगायचे आहे. भारत भरातून विविध क्षेत्रात प्रावीण्य मिळविणाऱ्या हया निवडक महिलांना सम्मान देण्यासाठी मंचकावरून शास्त्रीजी स्वतः खाली उतरले. माजी प्रधानमंत्र्यांचा मुलगा असा कुठलाही आविर्भाव त्यांच्या देहबोलीत नव्हता हे सभागृहाने आवर्जून पाहिले. हया प्रसंगी नागपूरच्याच उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ. अनिता उदय टेकाडे ह्यांना (समाजसेवा, डॉ. राजश्री मेश्राम (शिक्षा), प्रीती मनोज जाधव (क्रीडा क्षेत्र), साधना योगेश पापडकर (समाजसेवा व सायकलिंग) ह्यांना ही राष्ट्रीय स्त्री शक्ती सम्मान देऊन गौरविण्यात आले.

## केज बीडीओ पदाचा विठ्ठल नागरगोजे यांनी पदभार घेताच आर.पी.आय. पक्षाच्या वतीने केला सत्कार



केज / प्रतिनिधी :- केज येथील पंचायत समिती कार्यालयातील गटविकास अधिकारी या पदाचा कार्यभार विठ्ठल नागरगोजे यांनी नुकताच स्वीकारला आहे. विठ्ठल नागरगोजे यांनी पंचायत समिती केज बीडीओ या पदाचा कार्यभार नुकताच स्वीकारल्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आंबेडकर) या पक्षाच्या पदाधिकारी यांच्या वतीने दि.०३.०९.२०२५ रोजी त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाचे मराठवाडा अध्यक्ष भगवंत (आप्पा) वायबसे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बाळासाहेब जाधव, तालुका अध्यक्ष अश्रुबा (दादा)खरात,तालुका संघटक नवनाथ सोनवणे,अमोल जगताप,इंगळे, महादेव केदार,आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अजित पाटील कव्हेकरांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा कैलास निवासस्थानी शुभेच्छा देण्यासाठी अलोट गर्दी





लातूर :- भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांचा वाढदिवस धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. यामध्ये रक्तदान शिबिर, शैक्षणिक साहित्य वाटप, रुग्णांना फळे वाटप, अन्नदान, गोशाळेस चारा वाटप यासह विविध देवस्थानांमध्ये अभिषेक व महाआरती करण्यात आली. अजित पाटील कव्हेकर यांना शुभेच्छा देण्यासाठी कैलास निवासस्थानी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह राजकीय क्षेत्रातील पदाधिकाजयांनी अलोट गर्दी केली होती. भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या वाढदिवसानिमित्त सिध्देश्वर मंडलाच्या वतीने ग्रामदैवत श्री सिध्देश्वरास अभिषेक करून महाआरती करण्यात आली. तसेच सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान असलेल्या सुरत शहावली दर्गास चादर अर्पण करून अजित पाटील कव्हेकर यांच्या निरोगी व दिर्घायुष्यासाठी प्रार्थना करण्यात आली. त्याचबरोबर विविध भागामध्ये वृक्षारोपणही करण्यात आले. महात्मा बस्वेश्वर मंडलाच्या वतीने गोलाई येथील श्री जगदंबा देवीची महाआरती करून प्रार्थना करण्यात आली. अजित पाटील कव्हेकर यांच्या हस्ते बाजार समितीत असलेल्या गौरीशंकर मंदीरात अभिषेक करून महाआरती करण्यात आली. तसेच कव्हा येथे शेखमियाँ साहेब दर्गास चादर अर्पण करण्यात आली. रणंजित पाटील कव्हेकर व रागिनी यादव यांच्या उपस्थितीत रुग्णांना फळे वाटप करण्यात आली. तसेच मातोश्री वृध्दाश्रमासह शासकीय रुग्णालयात अन्नदान करण्यात आले.शहरातील विविध शाळांमध्ये गरजवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर मजगेनगर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सौ. अदिती पाटील कव्हेकर यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठया संख्येने रक्तदान केले. अजित पाटील कव्हेकर यांना शुभेच्छा देण्यासाठी कैलास निवासस्थानी सकाळपासूनच अलोट गर्दी करण्यात आली होती. शुभेच्छा देणाजयांमध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांसह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रातील अनेकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दाखवली होती. शहरातील विविध व्यापारी व उद्योजकांनी अजित पाटील कव्हेकर यांची भेट घेवून त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

राजकीय मान्यवरांनी दिल्या शुभेच्छा भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांना वाढदिवसानिमित्त जिल्ह्यासह राज्यातील अनेक राजकीय मान्यवरांनी दूरध्वनीवरून शुभेच्छा देवून त्यांच्या पुढील कार्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. यामध्ये प्रामुख्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले, माजी पालकमंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. रमेश कराड, आ. अभिमन्यू पवार, लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील मुरुमकर, प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर यांच्यासह आदींचा समावेश होता.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE